प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर, पहिला माळा, बी विंग, वनभवन, सिव्हील लाईन्स, नागपूर - 440 001,
दूरध्वनी क्र.(0712) 2530166, 2556916 फॅक्स क्र. (0712) 2550675 ई मेल- apccfnodal@mahaforest.gov.in

क्रमांक : कक्ष-17/नोडल/पूणे/आयडी-12939 (24)/ 578 /2022-23
नागपूर - 440 001, दिनांक:- 09/06/2022

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा),
पूणे

**विषय**:- Laying of underground OFC for High Speed broadband connectivity of Gram Panchayat in Mulshi Block of Pune Dist.in the State of Maharashtra (FP/MH/OFC/145751/2021)ú

**संदर्भ**:- 1) आपले पत्र क्रमांक अ/कक्ष-4/4(2)/जमिन/वनसंवर्धन-368/2022-23/94, दिनांक 02/06/2022.

2) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक कक्ष-17/NC/17-4/प्र.क्र.92/287/2021-22, दिनांक 16/06/2021.

3) शासन परिपत्रक क्रमांक एफएलडी-2015/प्र.क्र.08/फ-10, दिनांक 06/09/2021

भारतनेट/महानेट प्रकल्पातंर्गत वनक्षेत्रातून ऑप्टीकल फाईबर केबल टाकण्यासाठी वन (संवर्धन) अधिनियम-1980 अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यासंदर्भात या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक 16/06/2021 व शासन परिपत्रक दिनांक 06/09/2021 रोजी मार्गदर्शक सुचना जारी केलेल्या आहेत. सदरची प्रत पूढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

2.0 उपरोक्त विषयांकित प्रकरणी आपलेकडील संदर्भिय पत्र क्रमांक 1 अन्वये सदर प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावातील क्षेत्र विवरण तक्त्यामधील काही क्षेत्र ताम्हणी व सुधागड वन्यजीव अभयारण्यातून जात आहे असे निदर्शनास येत आहे. वन्यजीव अभयारण्यातून जात असलेल्या क्षेत्रासाठी राज्य वन्यजीव संस्था यांची पूर्व परवानगी घेणे क्रमप्राप्त आहे करीता वन्यजीव अभयारण्यातून जात असलेल्या क्षेत्राकरीता राज्य वन्यजीव संस्था यांची परवानगी घेणेकरीता प्रस्ताव वन्यजीव शाखेकडे सादर करण्यात यावा.

3.00 उक्त प्रकरणी, वन (संवर्धन) अधिनियम-1980 अंतर्गत भारतनेट/महानेट प्रकल्पातंर्गत वनक्षेत्रातून ऑप्टीकल फाईबर केबल टाकण्यासाठीचा प्रस्ताव सादर करतांना या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक 16/06/2021 रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांच्या अनूषंगाने प्रस्ताव तयार करून या कार्यालयात तात्काळ सादर करण्यात यावा. जेणेकरून सदरच्या प्रस्ताव राज्य शासनास पाठविणे सोईचे होईल.

**सहपत्र:- प्रस्तावाच्या 4 प्रती**

9/6/22

**(नरेश झुरमुरे)**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी**

प्रतिलिपी:- प्रधान सचिव (वने),महसूल व वनविभाग,मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस सादर.
प्रतिलिपी:- उपवनसंरक्षक (प्रा), पूणे यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्रतिलिपी:- भारत संचान निगम लिमिटेड, पूणे यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.